1S4 **DD1**

**D.El.Ed. Examination**

**JANUARY, 2023**

# MODEL ANSWER AND SCHEME OF MARKING

**Second Year (2016 Revised Syllabus)**

**PROFICIENCY IN MARATHI (Part-II)**

**Time : 3.00 to 4.00 Hrs.**

**Date : 13/01/2023** **(7 Pages)** **Max. Marks : 20**

**1.** (अ) (1) देवनागरी 1

(2) प्रकट/मौखिक 1

(ब) (1) काल्पनिक संवाद 1

(2) मुख्याध्यापकास पत्र. 1

**2.** **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *60* ते *80* शब्दांत लिहा :**

(1) **वृत्त लेखनातील महत्त्वाचे घटक :** 2

(*i*) वृत्ताचा मथळा/शीर्षक लक्षवेधक असावा.

(*ii*) वृत्तांत अचूक, परिपूर्ण व स्पष्ट असावा.

(*iii*) स्थळ, काळ, व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.

(*iv*) घटनांचा क्रम योग्य असावा.

(*v*) घटना जशी घडली तशीच वृत्तांत लिहावी.

(*vi*) भाषा होकारात्मक असावी.

(*vii*) भाषा साधी व सहज आकलन होणारी असावी.

(कोणत्याही 4 मुद्द्यांना 2 गुण)

(2) **परिच्छेद लेखन म्हणजे काय ? उदाहरणासह स्पष्ट करा.** 2

**व्याख्या :**

* एका मुद्द्याची परिपूर्ण मांडणी म्हणजे परिच्छेद लेखन होय.
* सलग लेखनाचा लहानसा भाग म्हणजे परिच्छेद होय.

**स्वरूप :**

* लेखक वाचकाला स्वत:चे अनुभव, विचार आणि तत्त्व सुसंगतरीत्या, अनुक्रमाने, कालक्रमाने पुढे नेत असतो.
* परिच्छेदात वाक्‌प्रचार, म्हणी यांचा वापर केलेला असतो.
* परिच्छेदात वापरलेली प्रतिमाने, शब्दचित्र, भावभावना, व्यक्तिचित्रण, संघर्ष या सर्व गोष्टींची साखळी गुंफलेली असते.

**उदाहरण :** (समर्पक परिच्छेद लेखनाचा नमुना)

(व्याख्या व स्वरूप 1 गुण, उदाहरण 1 गुण)

(3) **वाचनाचा प्रारम्भ करतांना करावयाच्या कृती :** 2

(*i*) वाचनाकरता निवडलेला मजकूर, शब्द, वाक्ये विद्यार्थ्यांच्या/मुलांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असावेत.

(*ii*) सोप्या गोष्टी, गाणी यांच्या मार्फत वाचन करण्यास शिकवू.

(*iii*) शब्दचित्रांच्या साहाय्याने वाचन करणे.

(*iv*) वाचनकार्डे, लाकडी अक्षरे, शब्दचित्र कार्डे यासारख्या शैक्षणिक साधनांचा वापर करून वाचन करणे.

(याप्रमाणे कोणतेही **4** उपक्रम/कृती–**2** गुण)

3. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 120 ते 160 शब्दांत लिहा :**

(1) **वाचन अध्यापनाच्या पद्धती :** 3

(*i*) मुळाक्षर पद्धती

(*ii*) गट पद्धती

(*iii*) शब्द पद्धती

(*iv*) वाक्य पद्धती

(*v*) प्रसंग पद्धती

(पद्धतींची नावे 1 गुण व यापैकी कोणत्याही **दोन** पद्धतींचे स्पष्टीकरण प्रत्येकी 1 गुण)

**किंवा**

**वाचन म्हणजे काय ? वाचनाची अंगे :**

**व्याख्या :** लिहिलेल्या किंवा छापलेल्या मजकुराचे अर्थ ग्रहण करून/आकलनासह केलेले ध्वनिउच्चारण म्हणजे 'वाचन' होय.

**वाचनाची अंगे :**

(*i*) शुद्ध व स्पष्ट वाचणे.

(*ii*) जोडाक्षरांचा अचूक उच्चार करणे.

(*iii*) विरामचिन्हे लक्षात घेऊन वाचणे.

(*iv*) आवाजात आशयानुरूप चढ-उतार करणे.

(*v*) योग्य स्वराघातासह वाचन करणे.

(*vi*) वाचलेल्या मजकुराचे आकलन होणे.

(व्याख्या 1 गुण, वाचनाची अंगे 2 गुण)

(2) वाचन वेग ही संकल्पना स्पष्ट करा. विद्यार्थ्यांचा वाचन वेग विकसित करण्याकरता उपाय. 3

**व्याख्या :** प्रकट वाचनात एका मिनिटात आकलनासहित किती शब्द वाचून होतात त्याला वाचन वेग असे म्हणतात.

**वाचन वेग काढण्याचे सूत्र :**

$$\text{वाचन वेग} = \frac{\text{वाचलेली शब्दसंख्या} \times 60}{\text{लागलेला वेळ (सेकंदात)}}$$

**वाचन वेगाचे दोन स्तर :**

(*i*) फक्त वाचणे

(*ii*) आकलनासह वाचणे.

**उपाय :**

(*i*) अक्षरतक्ते, शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या यांच्या साहाय्याने वाचनाचा सराव घेणे.

(*ii*) पाठांचे वाचन व अनुवाचन करून घेणे.

(iii) कवितांचे लयीत वाचन घेणे.

(iv) दुकानावरील पाट्या, भित्तिपत्रके यांचे वाचन करण्यास सांगणे.

(v) चित्रांचे वाचन करण्यास सांगणे.

(वाचन वेग संकल्पना 1 गुण, उपाय 2 गुण)

**किंवा**

**वाचन दोष व ते दूर करण्याचे उपाय :**

**वाचन दोष :**

(i) **प्रकट वाचन करतांना होणारे दोष :**

(1) अस्पष्ट आवाजात वाचन करणे

(2) वाचनातील अशुद्धता

(3) अपूर्ण वाक्य उच्चारण

(4) शब्दांची-अक्षरांची उलटापालट

(5) मनातील शब्दांचे उच्चारण

(6) शब्दांची पुनरावृत्ती

(7) हेल काढून वाचणे.

(ii) **मूक वाचन करतांना होणारे दोष :**

(1) अर्थ लक्षात न घेता वाचन करणे

(2) फार घाईघाईने वाचणे

(3) वाचतांना पुटपुटणे

(4) वाचतांना वेडेवाकडे हातवारे करणे

(5) ओळींवर बोट ठेवणे.

**उपक्रम :**

(*i*) परिपाठांतर्गत बातम्या वाचण्यास सांगणे.

(*ii*) कवितेचे वाचन करण्यास सांगणे.

(*iii*) आदर्श वाचनाचे नमुने ऐकवणे.

(*iv*) जोडाक्षर शब्दांचे वाचन करण्यास सांगणे.

(वाचन दोष 2 गुण, उपक्रम 1 गुण)

**4. खालील प्रश्नाचे उत्तर *200* ते *250* शब्दांत लिहा :**

**पत्रलेखनाचे प्रकार व पत्रलेखनाचा नमुना :** 4

**पत्रलेखनाचे प्रकार :**

(*i*) औपचारिक पत्रलेखन

(*ii*) अनौपचारिक

(*iii*) परिचय पत्रलेखन

(पत्रलेखनाचे प्रकार 1 गुण, प्रत्यक्ष पत्रलेखनाचा नमुना 3 गुण)

किंवा

हस्ताक्षरात सुधारणा होण्याकरताचे उपक्रम :

(i) अक्षरे व शब्द गिरवणे

(ii) योग्य शैक्षणिक साधनांची ओळख व वापर

(iii) हस्ताक्षर लेखन – कार्यशाळेचे नियोजन व आयोजन

(iv) हस्ताक्षराचे महत्त्व – व्याख्यान, स्पर्धा यांचे आयोजन.

(याप्रमाणे कोणतेही चार उपक्रम सविस्तर लिहिणे अपेक्षित, प्रत्येकी 1 गुण)